नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/११/२०२५ (शनिवार )**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध २ गुन्हे नोंद २ आरोपी अटक, २१ लाख ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक १४/११/२०२५ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा सालई फाटा ते नांदागोमुख रोड आणि मौजा तिडंगी शिवार ते नांदागोमुख रोड येथे नाकाबंदी केली अनुक्रमे १. इनोव्हा वाहन क्र एम.एच ३१ डी. व्ही. ७२९९ आणि स्कॉर्पिओ वाहन क्र एम.एच ४० सी. एक्स. ८५८२ हे वाहन मिळुन आले. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला इनोव्हा वाहन क्र एम.एच ३१ डी. व्ही. ७२९९ चा वाहन चालक **आरोपी नामे संजय अशोक जयस्वाल, वय ३८ वर्ष, रा. सेमीनरी हिल्स, नागपुर** हा असुन नमुद वाहनातुन वेगवेगळया कंपनीचे १७६.९२ किलोग्रॅम प्रतिबंधीत अन्नपदार्थ (सुगंधीत तंबाखु) किंमती १,१७,१६०/—रूपये, तसेच इनोव्हा वाहन किंमती ४,२०,०००/— रूपये असा एकुण ५,३७,१६०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. स्कॉर्पिओ वाहन क्र एम.एच ४० सी. एक्स. ८५८२ चा वाहन चालक आरोपी **नामे अनिकेत देवराव कोरडे, वय २५ वर्ष, रा.कळमना, उमरेड** हा असुन नमुद वाहनातुन वेगवेगळया कंपनीचे २२७.४ किलोग्रॅम प्रतिबंधीत अन्नपदार्थ ( सुगंधीत तंबाखु ) किंमती ३,२३,१००/—रूपये, स्कॉर्पीओ वाहन किंमती १३,००,०००/—रूपये आणि मोबाईल असा एकुण १६,३८,१०० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**दोन्ही कारवाईत एकुण ४०४.३२ किलोग्रॅम प्रतिबंधीत अन्नपदार्थ ( सुगंधीत तंबाखु ) , दोन चारचाकी वाहने आणि मोबाईल असा एकुण कि.२१,७५,२६० /—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये २ गुन्हे नोंद केला आहे. **नमुद दोन्ही आरोपींना पोलीसांनी अटक केली आहे.**

## जलालखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील ४ गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांनी पोलीस स्टेशन जलालखेडा हद्दीतील ४ आरोपीतांना हद्दपार केले.**

१)निलेश भिमराव शेंडे, वय. ३५ वर्ष, रा.थडीपवनी, त. नरखेड याचेवर अवैध दारूचे ५ गुन्हे दाखल आहे. २) आरोपी दिलीप उर्फ गोलू भागवतराव चरपे, वय ३९ वर्ष, रा. मेंढला, ता. नरखेड याचेवर विनयभंग, अश्लील शिवीगाळी दुखापत यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहे. ३) प्रल्हाद उर्फ दयाराम रामप्रसाद जुगसेनिया, वय ४८ वर्ष, रा. जोलवाडी, ता. नरखेड याचेवर चोरी, दुखापत यासारखे गंभीर गुन्हे नोंद आहे. ४) राजेंद्र जनार्दन पवार, वय ४९ वर्ष, रा. हिवरमठ, ता. नरखेड, नरखेड याचेवर अवैध दारूचे ८ गुन्हे दाखल आहे. नमुद चारही आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी हे गुन्हे करण्याच्या सवईचे असल्याने ते अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितात तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर ४

आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव जलालखेडा पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद चारही आरोपी यांना २ महीन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी.**



निलेश भिमराव शेंडे



दिलीप उर्फ गोलू भागवतराव चरपे



प्रल्हाद उर्फ दयाराम रामप्रसाद जुगसेनिया



राजेंद्र जनार्दन पवार

## मौदा पोलीस स्टेशन येथील अभिलेखावरील २ गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये उपविभागिय दंडाधिकारी कामठी आणि मौदा यांनी पोलीस स्टेशन मौदा अभिलेखावरिल आरोपी १) ईशांत शैलेश मासुरकर वय ३३ वर्ष, रा. कोळसा टाल, ता. कामठी, जि. नागपुर व २) भास्कर मोरेश्वर माथोरे, वय २१ वर्ष, रा. छिंदवाडा म.प्र. यांना नागपुर जिल्हयातुन हद्‌दपार केले आहे.

नमुद आरोपी यांचेवर दखलपात्र आणि अदखलपात्र गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी हे गुन्हे करण्याच्या सवयीचे असल्याने ते अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितात तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव मौदा पोलीसांनी संबधित उपविभागिय दंडाधिकारी यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून नमुद आरोपी

१) ईशांत शैलेश मासुरकर वय ३३ वर्ष रा. कोळसा टाल, ता. कामठी, जि. नागपुर यांस ३ महिन्यांकरीता नागपुर शहर आणी नागपुर ग्रामीण येथुन तसेच आरोपी क्र. २) भास्कर मोरेश्वर माथोरे, वय २१ वर्ष, रा. छिंदवाडा म.प्र. ह.मु. चंद्रशेखर चोपकर यांचे राहते घरी सिंधीलाईन, लाखोरी रोड लाखनी जिल्हा भंडारा यांस ३ महिन्याकरीता नागपुर शहर, नागपुर ग्रामिण व भंडारा जिल्हयातुन हद्दपार केले.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी.**



**ईशांत शैलेश मासुरकर**



**भास्कर मोरेश्वर माथोरे**

## आगामी निवडणुक दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे काढण्यात आला रूट मार्च

आगामी नगर परिषद/नगर पंचायत निवडणुक २०२५ असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत दिनांक १५/११/२०२५ रोजी रूट मार्च घेण्यात आला. नमुद रूट मार्च पोलीस स्टेशन बुटीबोरी शहर येथे रुट मार्च घेण्यात आला सदर रुट मार्च हा पोलीस स्टेशन बुटीबोरी ते प्रभाग क्रमांक ०२, ०३, दुर्गा मंदिर चौथे शिवक्रांती चौक, बिरसा मुंडा चौक, एच. बी.एल.टॉवर ते बुटीबोरी मार्केट रोड, शिवाजी चौक, हिवसे कॉम्प्लेक्स ते परत बुटीबोरी पोलीस स्टेशन या मार्गाने घेण्यात आला . सदर रूट मार्च मध्ये श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग

पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बोरी यांच्यासह पोलीस स्टेशन बोरी येथील अधिकारी अंमलदार , दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार आणि गृहरक्षक हजर होते.






## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक १४/११/२०२५ रोजी नरखेड पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की मुकेश शेखर कठाणे, रा वार्ड क्र ११ नरखेड याचे घराचे स्लॅबवर काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे १) मुकेश शेखर कठाणे, रा वार्ड क्र ११, नरखेड,जि नागपुर, ०२) दिलीप प्रतापराव ठाकरे, रा वार्ड क्र १७, नरखेड जि नागपुर, ०३) धनराज शामराव सुरजुसे, रा वार्ड क्र ०४, नरखेड जि नागपुर,०४) नंदु भाउराव भातकुलकर, रा. नरखेड, जि नागपुर, ५) मेहमुद मेहबुब शाह, रा. वार्ड क्र १५, नरखेड जि नागपुर,०६ ) जाहीर सगीर सय्यद, रा. वार्ड क्र १३ नरखेड, जि नागपुर,०७) साबीर अब्दुल रहेमान कुरेशी, रा. वार्ड क्र १५ नरखेड, जि नागपुर,८) शेख नब्बु शेख लाल, रा. वार्ड क्र ११ नरखेड, जि नागपुर, ९) अभिलाष भिमराव नारनवरे, वार्ड क्र १७ नरखेड जि नागपुर,हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. **आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तास पत्ते ,रोख रक्कम ८९००/— रूपये ,०७ अॅड्रॉईड मोबाईल किंमती ६,१०००/—रूपये आणि ०३ दुचाकी वाहने किंमती २,६०,०००/— रूपये आणि इतर**

**साहित्य असा एकुण ३,३०,१००/— रूपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच दारू बाळगुण विक्री, सेंवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ३९ गुन्हे नोंद. १२ लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**दिनांक १४/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू तसेच ईतर साहीत्य असा एकुण १२,५२,७१०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन मौदा येथे एकुण ४ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे एकुण ९ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे १ गुन्हा नोंद आह. पोलीस स्टेशन उमरेड येथे ३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे १ गुन्हा नोंद आह. पोलीस स्टेशन भिवापुर येथे १ गुन्हा नोंद आहे पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २ गुन्हे नोंद आहे पोलीस स्टेशन काटोल येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे ४ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवणी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे २ गुन्हे नोंद आहे.असे महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ३९ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत २४२६० मिली देशी दारू किंमती १०,५६०/—रूपये, ५१६५ लीटर मोहाफुल दारू किंमती ५,०७,८००/— रूपये, १९९५० लिटर सडवा,किंमती ७,१३,२५०/—रूपये, तसेच ईतर साहीत्य किंमती २१,१००/— रूपये असा एकुण १२,५२,७१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नााशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ६५३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १५/११/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६५३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण ११७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे २८ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १५ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी अशा एकुण १०४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ४४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३० आरोपी अशा एकुण ७४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २४ आरोपी अशा एकुण ११३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४६ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १५३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६५३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने